# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## कला मंडळ

सकाळ TODAY पुणे जिल्हा, मंगळवार, १५ सप्टेंबर २०१५



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या कला मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना भाऊराव कऱ्हाडे.

### राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाचे उद्‌घाटन

**राजगुरुनगर, ता. १४ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील कला मंडळाचे उद्‌घाटन 'ख्वाडा' या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटाचे निर्माता व दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील होते. सध्याच्या काळातील माध्यमे प्रगल्भ आणि समृद्ध झाली आहेत. त्यामध्ये करिअरच्या चांगल्या संधी असल्याने विद्यार्थ्यांनी त्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कऱ्हाडे यांनी केले. ग्रामीण भागातील मुलांमध्ये प्रचंड गुणवत्ता असून त्यांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला हवा. या वयातच ध्येय निश्चित करून त्यासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवायला हवी. आपल्याला आनंद देणाऱ्या क्षेत्रातच करिअर करा, असे आवाहन त्यांनी केले.

शालेय जीवनात दूरदर्शनवर चित्रपट पाहताना दृश्य माध्यमाचा माझ्यावर जो परिणाम झाला तेव्हापासून मी चित्रपट दिग्दर्शक होण्याचे ठरविले. त्यासाठी मला खूप संघर्ष करावा लागला, असे सांगून सामान्य शेतकरी कुटुंब ते पहिल्याच चित्रपटाला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार या कालावधीतील खडतर प्रवास त्यांनी उलगडून दाखविला.

प्रास्ताविक डॉ. ए. एम. पवार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले. कला मंडळाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख